आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३० जुलै २०२४ -मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सरकारी वसतीगृहं आणि आश्रमशाळांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दरडोई अनुदानात भरीव वाढ करण्याचा राज्य मंत्रीमंडळाचा निर्णय, ८१ हजार कोटी रूपये गुंतवणुकीच्या सात प्रकल्पांना मंजुरी
- आरक्षणाच्या प्रश्नावर सर्व समाजाच्या नेत्यांशी चर्चा करुन सर्वमान्य तोडगा काढण्याची माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मागणी
- यंदाचा पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील साहित्य जीवन गौरव पुरस्कार जेष्ठ साहित्यिक डॉ.प्रेमानंद गज्वी यांना, तर कलागौरव पुरस्कार तमाशा कलावंत हसन शेख पाटेवाडीकर यांना जाहीर
- केरळमधे वायनाड जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे दरड कोसळून ९३ जणांचा मृत्यू, १२८ जण जखमी

  **आणि**
- पॅरिस ऑलिंपिकमधे, नेमबाजीत मनु भाकर आणि सरबजोत सिंग यांना १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात मिश्र दुहेरीचं कांस्य पदक

**<><><><><>**

राज्यातली विविध विभागांची वसतीगृहं आणि आश्रमशाळांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दरडोई अनुदानात भरीव वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मंत्रीमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब झालं. आदिम जमातीतल्या कुटुंबांसाठी आवास योजना राबवण्यासह आदिवासी सहकारी सूत गिरण्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज द्यायलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. राज्यातल्या यंत्रमाग सहकारी संस्थांना राज्य सरकारकडून अर्थसहाय्य द्यायलाही आजच्या बैठकीत मान्यता मिळाली.

<><><><><>

उद्योग विभागाच्या मंत्रीमंडळ उपसमितीनं राज्यात ८१ हजार कोटी रूपये गुंतवणुकीच्या विशाल आणि अतिविशाल अशा सात प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या उपसमितीच्या बैठकीत हा निर्णय झाला. यामुळे कोकण, मराठवाडा, विदर्भ या भागात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार असून, राज्यात सुमारे २० हजार जणांसाठी प्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे.

या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, तसंच उद्योग मंत्री उदय सामंत उपस्थित होते.

<><><><><>

आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सर्व समाजाच्या नेत्यांना बोलावून चर्चा करावी आणि सर्वमान्य तोडगा काढावा, अशी मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. आरक्षणाचा प्रश्न लोकसभेतच सुटू शकतो, हे अधिकार राज्यांना नाहीत, असं ते म्हणाले. केंद्र सरकार आरक्षणाची मर्यादा वाढवण्यासंदर्भात तोडगा काढत असेल तर आमच्या पक्षाचा पाठिंबा असेल, असं त्यांनी सांगितलं. मराठा समाजाला न्याय मिळाला पाहिजे ही आमची भूमिका आहे, असं ते म्हणाले.

धारावीतल्या रहिवाशांना धारावीतच घर मिळायला हवं अशी आमची मागणी असून धारावीवासियांना बेघर होऊ देणार नाही, असंही उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितलं. राज्य सरकारनं पशुसंवर्धन खात्याचा भूखंड मुंबै बँकेला दिला असून महाविकास आघाडीचं सरकार आलं तर हा निर्णय रद्द करु, असं ते म्हणाले.

त्यापूर्वी आज मराठा आरक्षणाबाबत मराठा समाजाच्या आंदोलकांनी  उद्धव ठाकरे ह्यांची भेट घेऊन निवेदन दिलं.

<><><><>

सरकारनं मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेतला असून आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजने अंतर्गत महिलांना दरमहा दीड हजार रुपये आर्थिक सहाय्यासोबतच वर्षभरासाठी तीन घरगुती गॅस सिलिंडर मोफत देण्यात येणार आहेत. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागा अंतर्गत या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.  या योजनेचा लाभ मिळण्यासाठी गॅस जोडणी महिलेच्या नावाने असणं आवश्यक आहे.

<><><><>

आदिवासी शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या विविध योजनांचे लाभ मिळावेत यासाठी आदिवासी विभाग तसंच सहकार विभागानं सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या आहेत. आदिवासी विकास कार्यकारी सहकारी संस्थांच्या विविध मागण्यांसंदर्भात आज मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

आदिवासी शेतकऱ्यांसाठीच्या संस्थांना त्यांच्या गुणवत्तेनुसार वाढीव अनुदान द्यावं तसंच शबरी आदिवासी वित्त आणि विकास महामंडळाकडच्या थकीत कर्जाबाबत तोडगा काढावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

<><><><>

राज्याचे मावळते राज्यपाल रमेश बैस यांना आज निरोप देण्यात आला. राजभवनात झालेल्या या निरोप सभारंभाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, तसंच राजभवनातले अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

नवनियुक्त राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचा शपथविधी समारंभ उद्या संध्याकाळी साडेसहा वाजता राजभवनात होणार आहे.

<><><><><>

यंदाचा पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील साहित्य जीवन गौरव पुरस्कार जेष्ठ साहित्यिक डॉ.प्रेमानंद गज्वी यांना, तर कलागौरव पुरस्कार तमाशा कलावंत हसन शेख पाटेवाडीकर यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ.रावसाहेब कसबे यांनी अहमदनगर इथं ही माहिती दिली.

राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार डॉ.समीर चव्हाण यांना, राज्यस्तरीय विशेष साहित्य पुरस्कार प्रफुल्ल शिलेदार यांना, अहमदनगर जिल्हा साहित्य पुरस्कार डॉ.श्रीनिवास हेमाडे यांना, तर डॉ.विखे पाटील राज्यस्तरीय नाट्यसेवा पुरस्कार प्राजक्त देशमुख यांना मिळाला आहे. अहमदनगर जिल्हा विशेष साहित्य पुरस्कार प्रा.बाळासाहेब लबडे यांना दिला आहे.

येत्या नारळी पौर्णिमेला डॉ.विखे पाटील यांच्या १२४ व्या जयंती दिनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रविंद्र शोभणे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होईल. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील या कार्य.क्रमाला उपस्थित असतील, असं पुरस्कार निवड समितीचे निमंत्रक डॉ.राजेंद्र सलालकर यांनी सांगितलं.

<><><><><>

केरळच्या वायनाड जिल्ह्यातल्या मुंडक्काई, अट्टामाला आणि चूरमाला या भागात मुसळधार पावसामुळे आज भूस्खलन झाल्यानं ९३ जणांचा मृत्यू झाला तर १२८ हून अधिक जण जखमी झाले. जखमींवर विविध रुग्णालयात उपचार सुरू आहेत. भूस्खलन झालेल्या भागात एनडीआरएफचं पथक, लष्कर तसंच नौदलाचे जवान बचावकार्य करत आहेत. मुंडक्काईच्या डोंगराळ भागातून १५० नागरिकांना वाचवण्यात आलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेविषयी शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपयांची तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली.

<><><><><>

पॅरिस ऑलिंपिक मध्ये भारतीय नेमबाज मनु भाकर आणि सरबजोत सिंग या जोडीनं पॅरिस ऑलिपिंकमधे १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात मिश्र दुहेरी गटातं कांस्य पदक पटकावलं आहे. स्वातंत्र्योत्तर काळात एकाच क्रीडा प्रकारात एकाच ऑलिंपिकमधे दोन पदकं मिळवणारी मनु भाकर ही पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे. सरबजोत सिंग याने त्याचं पहिलं ऑलिंपिक पदक पटकावलं आहे.

भारताच्या हॉकी संघाने आयर्लंडवर २-० अशी मात करत पुढच्या फेरीत प्रवेश केला. बॅडमिंटन पुरुष दुहेरी मध्ये भारताच्या सात्विक साईराज रांकी रेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे. भारतीय टेबलटेनिसपटू मनिका बात्राने उपउपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

<><><><><>

५६व्या रसायनशास्त्र ऑलिंपियाडमधे जळगावच्या देवेश पंकज भैया या विद्यार्थ्यानं सुवर्ण पदक मिळवलं. मुंबईतल्या अवनीश बन्सलने रौप्यपदक तर कश्यप खंडेलवालने कांस्य पदक मिळवलं. याखेरीज हैद्राबादच्या हर्षिन पोसीनालाही रौप्य पदक मिळालं. सौदी अरेबियामधे रियाध इथं झालेल्या या स्पर्धेत ९४ देशांमधले मिळून ३२७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

<><><><><>

नवी मुंबई इथं घडलेल्या २२ वर्षीय तरुणीच्या हत्या प्रकरणात फरार आरोपी दाऊद शेख याला कर्नाटकात अटक करण्यात आली. त्याच्यासह अन्य एकालाही

अटक करण्यात आली आहे. २७ जुलै रोजी उरण इथं निर्जन ठिकाणी एका तरुणीचा छिन्नविछिन्न अवस्थेतला मृतदेह सापडला होता.

**<><><><><>**

मराठवाड्यातल्या खालसा झालेल्या देवस्थानच्या जमिनी वर्ग दोन मधून वर्ग एक मध्ये आणण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. त्यामुळे या जमिनी मूळ मालकाला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठेवण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत.

**<><><><><>**

येत्या २ दिवसात कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल.

विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडेल असा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

**//<><><><><>//**